छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई

# संग्रहालयातील उत्कृष्ण कलाकृती



## कौटंबिक उपक्रम

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय

CSMVS

100 YEARS

CSMVS CHILDREN'S MUSEUM IS SUPPORTED BY

BANK OF AMERICA



शिल्पकला गॅलरीच्या प्रवेशद्वारावर परळमधील शिवाचे शिल्प आणि त्यांचे वाहन नंदी शोधा.

खालील वैशिष्ट्ये आपल्याला सांगतात की तो शिव आहे.

| ही वैशिष्ट्ये शोधा | या वैशिष्ट्यांचा अर्थ |
|---|---|
| ☐ त्रिशूळ | राक्षसांचा नाश करणारा |
| ☐ तिसरा डोळा | ज्ञान आणि बुद्धी |
| ☐ साप | सतर्कता |
| ☐ विणलेले केस आणि मुकुट | एक महान गुरू |

या उपक्रमाद्वारे एका महान राजाच्या शिल्पापर्यंत पोहोचा!



या पाषाण शिल्पात राजा शाल एका तपस्व्याला वाचवण्यासाठी सिंहाचा वध करताना दिसतात. त्याचे मोठे डोळे, तीक्ष्ण नखे आणि उघडे तोंड पहा. शूर राजा या सिंहाचा तलवार आणि ढालीने पराभव करतो.

एक महत्त्वपूर्ण माहिती म्हणजे हे शिल्प मूळतः कर्नाटकातील एका मंदिराचा भाग होता, जे मंदिर होयसाळ राजांच्या या प्रसिद्ध दंतकथेसाठी ओळखले जाते.

ही वैशिष्ट्ये शोधा

- ○ शिकारी कुत्रे
- ○ रानडुक्कर
- ○ हत्ती
- ○ झाडावर बसलेला तपस्वी

चला शिल्प गॅलरीतून पायऱ्यांनी पहिल्या मजल्यावर जाऊ. तुम्हाला "लहान" चित्रे असलेली गॅलरी दिसते का? गॅलरीच्या आत, तुमच्या डावीकडे, तुम्हाला आयताकृती भूर्जपत्रांची हस्तलिखिते दिसतील.



भारतीय लघु चित्रकार खारिच्या पातळ केसांनी बनविलेले ब्रश वापरत होते. तुमचे सर्वात टोकेरी पेन किंवा पेन्सिलचा वापर करून तुम्ही चित्रांवर दिसणाऱ्या कोणत्याही आकृतीचे चित्र काढा.

भारतीय लघु चित्रकला गॅलरीच्या समोर तुम्हाला मैत्रेय बुद्धाची एक मोठी मूर्ती दिसेल. हिमालयन कला गॅलरीमध्ये प्रवेश करा, तुमच्या उजवीकडे वेगळ्या प्रकारची वाद्ये बघा.



तुम्हाला सर्वात आकर्षित करणारी □ वाद्ये लिहा.





तुम्हाला भारतातील सचित्र हस्तलिखिते दिसता आहेत का? ते जैन आणि बौद्ध ग्रंथांचे आहेत. ह्या ग्रंथ आपल्याला महावीर आणि इतर तीर्थंकरांची, आणि बुद्धाची कथा सांगतात. त्यावर लाल, पिवळा, पांढरा, हिरवा, इंडिगो आणि निळा असे रंग वापरले गेले आहेत.

चला मुद्रा आणि आभूषण गॅलरीत जाऊ.

ते पहिल्याच मजल्यावर आहे. प्रिंट्स गॅलरीमधून जाऊया.

विविध प्रकारच्या नाण्यांकडे लक्ष द्या आणि त्यांच्यावरील चिन्हे पहा, ही चिन्हे वापरून तुमचे स्वतःचे नाणे तयार करा.



(नाणी कोणत्याही आकाराची असू शकतात, आणि त्यावर सामान्यत: राजाचा चेहरा किंवा मुद्रांकित चिन्हे किंवा काही प्रकारचे लेखन असू शकते.)

आज खूप शिकलो? चला दुसऱ्या मजल्यावर जाऊ आणि गॅलरीत वस्त्र आणि वेशभूषेवरील डिझाइन जवळून पाहू.

तुम्हाला सर्वात आकर्षक वाटणारी काही चिन्हे आणि डिझाइन काढा.



शाब्बास! आता बाहेरील बागांजवळील बालवस्तुसंग्रहालयाकडे जाऊया आणि संग्रहालयातील ऐतिहासिक वस्तूंसह आपली ही मैत्री चालू ठेऊया.